# आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा माळा, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई – ४०० ०२३.

वाचा :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर ११८८/२७५३३/११ब दि.२९.११.१९८८.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर११९७/४०२८८/५ ब दि.२१.०७.१९९९.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर २०००/एलएबी/५ ब दि.१४.०२.२०००.

विषय:- विदेशी मद्य, देशी मद्य व बिअरच्या बाटल्यांवर लावण्यात येणारे लेबल मंजुरीबाबत.

## परिपत्रक

क्रमांक :- बीपीए-१११८/१८७७३/सात

मुंबई, दि. २९ जुलै, २०१९.

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्य शासनाचा राजस्व विभाग आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायदा,१९४९ मधील तरतुदीनुसार मद्य, मद्यार्क उत्पादन व विक्री तसेच यासाठी लागणारे कच्चे पदार्थ यांच्याशी संबंधित विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार या विभागास आहेत. सदर क्षेत्रामधुन राज्य शासनास महसुल प्राप्त होतो. या क्षेत्रातील उद्योगास वेगवेगळया परवानग्या मिळण्यास विलंब होत असल्याच्या सुचना/निवेदन प्राप्त होत आहेत. अशा अडचणींमुळे उद्योगाच्या कार्यप्रणालीवर पर्यायाने शासनाच्या महसुलावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे. गतीमान प्रशासन व उद्योगधंद्यांना Ease of Doing Business या धोरणांतर्गत कालबाहय नियम व प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे जाणवते.

त्याअनुषंगाने शासनाने स्थापन केलेल्या कार्यगटाच्या शिफारशी स्विकारण्यात आल्या असुन पुढील प्रमाणे सुधारित सुचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अ‍ॅण्ड मॅन्युफॅक्चन ऑफ पोटेबल लिकर रुल्स १९६६ चा नियम १७ (२६), महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ चा नियम ६ (२४) तसेच महाराष्ट्र मॅन्युफॅक्चर ऑफ बिअर अ‍ॅण्ड वाईन रुल्स १९६६ चा नियम ११ (४) मधील तरतुदीनुसार अनुक्रमे विदेशी मद्य, देशी मद्य व बिअरच्या बाटल्यांवर लावण्यात येणारे लेबल्स आयुक्तांकडुन मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरीता

निर्गमित करण्यात आलेल्या या कार्यालयाच्या उपरोक्त नमुद परिपत्रकांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१. घटकांनी प्रथम मंजूरीसाठी सादर केलेली लेबले कार्यालयातील सूचना फलकांवर १५ दिवसाच्या कालावधीकरिता प्रदर्शित करण्यात येतील.

२. १५ दिवसांचे कालावधीत अन्य घटकांकडून सुचना फलकांवर प्रदर्शित केलेल्या लेबल्सवर आक्षेप प्राप्त न झाल्यास तदनंतर कार्यालयीन कामकाजाचे दहा दिवसाच्या आत लेबल मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

३. आक्षेप प्राप्त झाल्यास त्यावर एक महिन्यात अंतिम निर्णय पारित करण्यात येईल.

४. परदेशातील निर्यातीकरीता मंजूर करावयाची लेबल्स ज्या देशाकरिता मंजूर करावयाची आहेत त्या देशातील तरतुदीनुसार मंजुर करण्यात येतील. अशा लेबलसाठी राज्यांतर्गत तरतूदी लागू राहणार नाहीत.

५. मंजुर करण्यात आलेल्या लेबल्सचा वापर मंजुरीपासुन ६ महिन्यामध्ये केला गेला नाही तर सदर लेबल आपोआप रदद होतील. तसेच लेबल मंजूरीनंतर घटकाने २ वर्षात नियमित उत्पादन घेतले नसल्यास सदर ब्रॅण्डचा (लेबल) वापर करण्याबाबत आयुक्त निर्णय घेतील.

(प्राजक्ता लवंगारे-वर्मा)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) राज्यातील सर्व देशी/विदेशी मद्य तसेच बिअर निर्माणी घटक. (मार्फत:- संबंधीत अधीक्षक,रा. उ.शु. )
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४) या कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी
५) कार्यासन क्रमांक ५ व अभिलेख शाखा (५ प्रती)